December - 2017 E-ISSN: 2321-4953

# IRFA'S UNIRESEARCH

## Multidisciplinary International E-Research Journal

Vol.- IX Issue - VI

*Indexed in DRJI & Indian Citation Index* *Double Blind Peer Reviewed Journal*

UGC Approved List No. 63005 *Cosmos Impact Factor - 3.020 [2015]*

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all

Home About Us Organization Commission Universities Colleges Publications

UGC Approved List of Journals

Home

You searched for **uniresearch**

**Total Journals : 1**

Show 25 entries Search:

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 63005 | Uniresearch- Multidisciplinary International E-Research Journal | International Research Fellows Association | 23214953 | |

Showing 1 to 1 of 1 entries Previous 1 Next

For Students For Faculty More

Chief Editor :
Dr. Dhanraj Dhangar,
Deptt. of Marathi,
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist. Nashik.[M.S.] India
Email: dhanrajdhangar@gmail.com
Mob. 7775982534

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details, visit us on : www.uniresearch.net.in

International Research Fellow Associations

'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal
UGC Approved List No. 63005 *Impact Factor - 3.020*
Vol. 9 Issue. 6
ISSN 2321-4953 (Online)
December - 2017

## EDITORIAL BOARD

**Chief & Executive Editor:**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assistant Professor,
Dept. of Marathi,
M.G.V.'s Arts & Commerce College, Yeola,
Dist - Nashik [M.S.] India.

**Associate Editors:**
**Mr.Tufail Ahmed Shaikh**, King Aziz City for Science & Technology, Riyadh Kingdom Saudi Arabia.
**Dr. Anil Dongre**, Head, Dept. of Management, North Maharastra University, Jalgaon.
**Dr. Bhausaheb V. Game**, Act. Principal, MGV's Arts & Commerce College, Yeola, Nashik.
**Dr. Leena Pandhare**, HoD English, L. V. H. College, Panchavati-Nashik [M.S.] India.
**Dr. P. K. Shewale**, Vice Principal, MGV's Arts, Commerce & Science College, Harsul, Nashik.
**Dr. Rekha Gajare**, Bhusawal Arts, science & P.O. Nahata,Commerece College, Bhusawal.
**Dr. Gajanan Wankhede**, Asst. Prof. Dept. of Hindi.Baliram Patil College, Kinwat, Nanded
**Dr. B. M. Sonawane**, M.G.V.'s Arts College, Saundane, Dist - Nashik
**Prof. Atul Suryawanshi**, S.S.M.M. College, Pachora
**Prof. Vijay Shirsath**, Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon
**Prof. B. P. Shewale**, MGV's Arts, Commerce & Science College, Saundane, Nashik.
**Mr. Munaf Shaikh**, North Maharashtra University, Jalgaon
**Prof. D. M. Badure**, N. S. B. Arts, Commerce & Science College, Nanded.
**Mr. Vinod Bhalerao**, J.N. V. Kangda Himachal Pradesh.

**AdvisoryBoard:**
**Dr. M. S. Pagare**, Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon.[M.S.]
**Dr. Marianna kosic**, Scientific-Cultural Institute, Mandala, Trieste, Italy.
**Dr. S. M. Tadkodkar**, Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University.Goa,India.
**Dr. Bajarang Korde**, Professor & Head, Dept. of English, Pune University. Pune, [M.S.] India
**Dr. R. P. Singh**, Dept. of English and Modern European Languages University of Lucknow [U.P.] India
**Dr. N. V. Jayaraman**, Director-Training and Placement, SNS Technical Institutions, Coimbatore

**Review Committee:**
**Dr. Shailendra Lende**, Dept. of Marathi, R.T.M. Nagpur University, Nagpur
**Dr. Sayyed Zakir Ali**, HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
**Dr. R. R. Kazi**, North Maharashtra University, Jalgaon.
**Dr. Vandana Chaudhari**, KCE's College of Education, Jalgaon.
**Dr. Vidya Vyavhare**, HOD, Marathi, KCE's M. J. College, Jalgaon.
**Dr. Sanjay Baviskar**, HOD, Marathi, D. N. Bhole College, Bhusawal.
**Dr. KalpanaPatil**, HOD, Hindi, D. N. College, Faizpur.
**Dr. K. R. Udmale**, Rtd. HOD, Cost and Works Accounting, M.S.G. College, Malegaon Camp, Nashik,

**Contact us on :** uniresearch99@gmail.com / researchjourney2014@gmail.com
Mobile No. : Prof. Dhanraj T. Dhangar - (President, IRFA) + 7775982534 / 9665398258

**Publishers :** International Research Fellows Association (IRFA) &
Mrs. Swati Sonawane, Director, Swatidhan Publication, Nashik (Mo. 9665398258)

*The respective authors are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Our review committee members have checked papers on their level best to stop furtive literature. Please send your valuable suggestions to us on uniresearch99@gmail.com*

*- Executive Editor*

'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal
UGC Approved List No. 63005 *Impact Factor - 3.020*
Vol. 9 Issue. 6
ISSN 2321-4953 (Online)
December - 2017

## INDEX


| No. | Title of the paper / Name of the Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | Life and Mission of Mahatma Phule - Dr. M. S. Pagare | 04 |
| 2 | Impact of Social Media on Society - Dr. Rajendra Dhande | 19 |
| 3 | Ethanobotanical Studies on *Grewia hirsute* Vahl. among the Ethnic people of Nizamabad and Kamareddy Districts, Telangana State - Shivraj Bembrekar and Vijigiri Dinesh | 24 |
| 4 | A Study of Demonetisation and it's Impact on ndian Household investment Patterns - Harshada Aurangabadkar & Dr. Anil Dongare | 27 |
| 5 | Co-Operative Movement in Maharashtra : An Overview - Dr. Vijay Mistary | 33 |
| 6 | An Analytical Study of Influencing Attributes for Customer Satisfaction in the Context of Online Shopping in Pune City - Rahul Wagh, & Dr. Anil Dongre | 37 |
| 7 | A Geographical Study of General land use Pattern in Dongarwadi Village - Dr. Prakash Raut | 43 |
| 8 | Content Analysis of Journal of Intellectual Property Rights - Dr. Chandramani Gajbhiye | 46 |
| 9 | The Importance of English Language - Archana Tiwari | 57 |
| 10 | इक्कीसवी सदी के कुछ उपन्यासों में नारी विमर्श – प्रा. एम. डी. नायकू | 60 |
| 11 | माता प्रसाद का नाटक 'अछूत का बेटा' में दलित चिंतन - डॉ. आनंद वक्षी | 66 |
| 12 | अनामिका के स्त्रीवादी चिंतन का संवोध्य – डॉ. रेखा गाजरे | 70 |
| 13 | इक्कीसवी सदी के उपन्यासों में अभिव्यक्त समाज और सामाजिक जीवन – डॉ. सुनील कुलकर्णी, डॉ. प्रीति सोनी | 78 |
| 14 | रामधारी सिंह दिनकर के काव्य में नारी विमर्श - डॉ. पूनम बोरसे | 82 |
| 15 | सुनीता जैन की कविता में नारी विमर्श – प्रियंका महाजन | 87 |
| 16 | भारतभूषण अग्रवाल कृत 'वसीयत' कविता की संरचना - डॉ. गीता दोड़मणी | 92 |
| 17 | पर्यावरणीय सरोकार की कविताएँ – डॉ. रेखा गाजरे | 96 |
| 18 | मृणाल पांडे की कहानियों में महानगरीय जीवन – प्रा. योगिता उशीर | 103 |
| 19 | हिंदी गज़ल और दुश्यंतकुमार – प्रा. विष्णू राठोड | 106 |
| 20 | सुनीता जैन का काव्य : सामाजिक विघटन की त्रासदी – प्रियंका महाजन | 109 |
| 21 | गज़लकार दुष्यंत कुमार की गज़लों में व्यंग्य की तेज-तर्रार धार - प्रा.विजय लोहार | 112 |
| 22 | समकालीन हिंदी कविता में संवेदना - डॉ. साहेबराव गायकवाड | 116 |
| 23 | आदिवासी : संवेदना एक सृजन - डॉ. शैलजा जायस्वाल | 121 |
| 24 | बंजारा लोकगीतातील रसाविष्कार – प्रा. तुकाराम चव्हाण | 123 |
| 25 | नव्वदोत्तर स्त्रीवादी कादंबरी (काही निवडक लेखिकांच्या संदर्भात) - प्रा. नीता तोरणे | 127 |
| 26 | वर्तमान शिक्षणपद्धतीचे बाजारीकरण: एक समस्या शोध व बोध - डॉ. हरिदास आखरे | 134 |
| 27 | भारतीय लोकसाहित्य : एक दृष्टीक्षेप – प्रा. विनोद भालेराव | 137 |
| 28 | लीळाचरित्रातील चरित्र नायक रेखाटणारा शिष्य : म्हाईंभट – डॉ. माधुरी पाटील | 141 |
| 29 | संतांचे सामाजिक सांस्कृतिक आणि वाङ्मयीन कार्य – डॉ. शीला गाढे | 144 |

'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal | ISSN 2321-4953 (Online)
UGC Approved List No. 63005 *Impact Factor - 3.020*
Vol. 9 Issue. 6 | December - 2017



| | | | |
|---|---|---|---|
| 30 | संत तुकारामच्या अभंगातील जीवनमूल्य | – डॉ. अनिता वाळके | 150 |
| 31 | भारुडाची वाटचाल | – डॉ. शीला गाढे | 154 |
| 32 | मुखवटे नृत्य : उगम व विकास | - डॉ. अंजली मस्करेन्हस | 157 |
| 33 | समस्याप्रधान नाटक 'अधांतर' | – डॉ. दीपक बाऊस्कर | 162 |
| 34 | नागराज मंजुळे यांची कविता | - डॉ. सुरेश खोब्रागडे | 168 |
| 35 | वैशिष्ट्यपूर्ण मंचीय कविता 'मौनांची भाषांतरे' | - श्री नरेंद्र खैरनार | 177 |
| 36 | कालबाह्य होत चाललेली उच्च शिक्षण पद्धती | – कु.पौर्णिमा राहंगडाले | 181 |
| 37 | पौराणिक पार्श्वभूमी आणि मिथकांचे नाटकातील स्थान | – डॉ. वर्षा गायकवाड | 185 |
| 38 | प्रसारमाध्यमे आणि क्रांती | – प्रा. विनोद भालेराव | 187 |
| 39 | भारत सासणे यांची कथा | - डॉ बाबाराव ठावरी | 190 |
| 40 | प्रा. सदानंद बोरकर यांचे नाट्यविश्व | - प्रा. संजयकुमार निंबेकर | 197 |
| 41 | 'हाल्या हाल्या दुधू दे' : एक ग्रामीण वास्तव चितारणारी कलाकृती | - डॉ. भाऊसाहेब गमे | 201 |
| 42 | अस्मितादर्शमधील प्रकाशित साहित्य (१९६८-७८) | – प्रा. सर्जेराव रणखांब | 205 |
| 43 | अथर्ववेदातील गृहस्थाश्रम वर्णन एक परिपूर्ण कुटुंबव्यवस्था विचार | – प्रा. दर्शना सायम | 209 |
| 44 | समाजसुधारक संत गणपती महाराजाचे स्त्रीविषयक कार्य | – डॉ. प्रभावती विहिरे | 214 |
| 45 | रघुनाथरावांच्या उत्तरेकडील मोहिमा मराठेशाहीला हानिकारक | – प्रा. के. ए. गावंडे | 217 |
| 46 | आगरकरांच्या तत्त्वविचारांची सामाजिक मीमांसा | – प्रा. राकेश कंभे | 219 |
| 47 | जलप्रदूषण : एक अध्ययन | - डॉ. सुरेश बन्सपाल | 222 |
| 48 | काजूगर प्रक्रिया उद्योगाचे अर्थकारण | – प्रा. डी एम. पाटील | 225 |
| 49 | सद्यस्थितीत गांधीजींच्या विचारांची आवश्यकता | – डॉ. नंदकिशोर उगले | 231 |
| 50 | भारतीय स्वातंत्र्य चळवळ विशेष संदर्भ नाशिक जिल्हा : एक अभ्यास | - डॉ. संतोष बोडके | 235 |
| 51 | दलितांच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगतीत दलितेतरांचे योगदान | - प्रा. सर्जेराव रणखांब | 241 |
| 52 | जागृत मतदार चळवळीची आवश्यकता | - प्रा. दत्तात्रय गाढे | 245 |



*The respective authors are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Our review committee members have checked on their level best to stop furtive literature. Please send your valuable suggestions to us on unireseach99@gmail.com*

*- Executive Editor*

Contact us on : uniresearch99@gmail.com / researchjourney2014@gmail.com

Mobile No. : Prof. Dhanraj T. Dhangar - (President, IRFA)+91 7775982534 / 7620578291

Publisher : Mrs. Swati Dhanraj Sonawane –
Director, Swatidhan Publiacation Yeola (Nashik) 423401
Mobile No. 9665398258

© - Swatidhan International Publications, Yeola (Nashik) Price : Rs. 150/-

# 'अस्मितादर्श' मधील प्रकाशित साहित्य (१९६८ ते ७८)

प्रा.सर्जेराव रणखांब
(मराठी विभाग)
देगलूर महाविद्यालय, देगलूर
Email id : sbrankhamb@gmail.com
मो.क्रं.९४२२५३३६६७

**कविता :-**

प्रस्तुत नियतकालिकातील कवितांचे स्वरुप वैविध्यपूर्ण आहे. दलित जीवनाचे वास्तव दर्शन घडविणाऱ्या, परंपरावाद्यांच्या ढोंगीपणावर प्रहार करणाऱ्या हिंदूधर्मातील अनिष्ट चालीरिती यांचा समाचार घेऊन सडेतोड अभिप्राय नोंदविणाऱ्या, हिंदू मानसिकतेतून मुक्त होऊन मानवी मूल्याची प्रस्थापना करु पाहणाऱ्या, बहुजनसमाजाच्या दारिद्र्याचे दर्शन घडविणाऱ्या, शोषणाविरुध्द आवाज उठविणाऱ्या, स्वत्व शोधणाऱ्या, वेदनाविद्रोह आणि नकार प्रकट करणाऱ्या कविता आहेत. या कवितेच्या पाठीमागे सामाजिक समतेची हाक आहे. डॉ.आंबेडकरांची प्रेरणा आहे. दलित कविता ही खऱ्या अर्थाने अस्मितादर्शमधूनच मोठ्या प्रमाणात प्रसिध्द झाली आहे.

दु:खाने पिचून गेल्यानंतर मुक्तीचा मार्गही केव्हा तरी निघेल अशी आशाही काही कवितातून दिसून येते. त्यापैकीच डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांची कविता अशी आहे.

पाठीवरुन वाहताना ओझे
रस्त्यलाही पडल्या भेगा
तेव्हा आकाशातून अश्रू बरसले
पण अंधार एवढा किट्ट की,
कुणालाच काही दिसले नाही
अजूनही केव्हा केव्हा वाटते
जगात एवढा काळोख नसावा
उजाडेल केव्हा तरी
आम्हीच पेरलेयत ना
दगडा दगडातून सूर्य-
(अस्मितादर्श - जून १९७०)

दु:खाची गाणी गाणंसुध्दा कधी जीवावर कसं येतं सांगताना राजा राजवाडे लिहितात-

दु:खाची गाणी गाणाऱ्या कवीचा धावून येतात घोटायला गळा
म्हणतात हा द्रोही कवींच्या जातीतला
हळुवारशा स्वप्नांना लावतोय विळा !
(जून-६९ पृ.३)

तर कधी प्रसन्नकुमार पाटील भांबावून ईश्वरालाच म्हणतो.

'दान द्यायचेच होते
तर का असे उलटे दान देत गेलास तू
का घेतली नाहीस तू परवानगी माझी.
सांग ईश्वर जन्म देताना'
(जून ६९ पृ.६)

अशा वैविध्यपूर्ण कविता - अस्मितादर्श मधून प्रकाशित झाल्या आहेत.

**अस्मितादर्श मधील दलित कथा :-**

साठोत्तरी काळातील मराठी कथाक्षेत्राला वेगळं परिमाण देणाऱ्या, जीवनानुभव व्यक्त करणाऱ्या कथा आहेत. शंकरराव खरात यांची 'आडातलं भूत', रा.रं.बोरो यांची 'पान्हा' बाबूराव बागुलांची 'पान' योगिराज वाघमारेंची 'बेगड' योगेंद्र मेश्रामांची 'पडाव' अशा काही प्रातिनिधिक कथांचा उल्लेख करता येईल.

जीवनाचा शोध, विद्रोहाची कथा, प्रखर जीवन संघर्ष असे या कथाचे स्वरुप आहे. एखादे शेत पडीक असावे आणि त्या शेतावर मशागत व्हावी म्हणजे कसे जोमाने पीक येतं तसं आज झालं आहे. असं दलित कथेच्या संदर्भात डॉ.कोत्तापल्ले म्हणतात. आणि खरंच अस्मितादर्शने या लेखकांची मशागतच केलेली आहे. आपण अस्मितादर्श मधूनच घडलो कसे ? हे प्रसिध्द कथाकार योगीराज वाघमारे, अस्मितादर्श तेवढे दर्जेदार आहे तेथेच बहुतेक माझे लेखन प्रकाशित झाले आहे, याचा अभिमान वाटतो. सत्यकथा व प्रतिष्ठान या नितकालिकांकडं कथा पाठविल्या होत्या. पण त्या परत आल्यावर त्यांच्या वाट्याला गेलो नाही. असे मनोगत व्यक्त करतात.

मराठी कथेचे जाणीव विश्व विस्तारित करणाऱ्या कथा ह्या अस्मितादर्शमधून आल्या आहेत. कारण या कथेचे विषय म्हणजे व्यथालय आहे. ही व्यथाभूमी आहे. ती मूलभुत जीवननिष्ठा व्यक्त करताना दिसते. बंधु बांधवाच्या बलुतेदारीवरचा पीळ पाडणाऱ्या कथा, खरातांच्या कथेतील माणूस, योगीराज वाघमारेंच्या कथेतील जीवन हे सारे व्यथालयातून आकार घेऊन आलेले आहे. यावरुन प्रचीती येते.

जीवनातील ताण-तणाव व्यक्त करुन प्रचलित समाजव्यवस्थेविरुध्द विद्रोह व्यक्त करणाऱ्या कथा अस्मितादर्श मध्ये आहेत.

**अस्मितादर्श मधील साहित्य-समीक्षा :-**

तात्कालिक काळात प्रकाशित झालेल्या पुस्तकांची परिक्षणे शिवाय खास असे वाङ्मयीन विषय निवडून त्यावर केलेली चर्चा, दलित साहित्याची चिकित्सा, काही दुर्लक्षित विषयावर संशोधनात्मक लिखाण असे. स्थूलमानाने अस्मितादर्श मधील समीक्षाविषयक लेखांचे स्वरुप आहे

प्रा.केशव मेश्राम, प्रा.रा.ग.जाधव, डॉ.भालचंद्र फडके, गंगाधर पानतावणे, शशिकांत लोखंडे, प्रा.खुशाल आचमारे, प्रा.दत्ता भगत, राजा जाधव, म.ना.वानखडे, म.भि.चिटणीस आदी समीक्षकांनी स्वतंत्र साहित्यविषयक दृष्टीने वा पुस्तकांच्या परिक्षणांच्या रुपाने अस्मितादर्श मधून लेखन केलेले आहे. एकूण नववाङ्मयीन प्रवृत्ती व जाणीवा व्यक्त करणारे जे साहित्य आहे, सामाजिक प्रबोधनाची आच ज्या साहित्याच्या पाठीमागे आहे. त्यावर विशेष चर्चा अस्मितादर्श मधून झाल्याचे दिसून येते.

दलित साहित्याचे स्वरुप, त्याचे स्वतंत्र साहित्यशास्त्र असू शकते काय ? दलित साहित्याच्या प्रेरणा यावर प्रस्तुत नियतकालिकांतून गांभिर्याने उत्साहाने लेखन झाल्याचे आढळते. दलित साहित्य या नियतकालिकाचा मोठा वाटा आहे.

**परिसंवाद हे एक वैशिष्ट्य :-**

अस्मितादर्श मधील परिसंवादातून साहित्य-समाज व संस्कृती यांच्या संदर्भात पोटतिडकीने चर्चा झाल्याचे दिसून येते.

दिवाळी अंकातून हे परिसंवाद जास्त प्रमाणात घडून आलेले आहेत. शिवाय अस्मितादर्श मेळावा यातूनही मोठ्या प्रमाणावर परिसंवादाची घडवून आणलेले आहेत.यात भाग घेण्यासाठी मान्यवरांना, विचारवंतांना, साहित्यिकांना समीक्षकांना निमंत्रित केलेले आहे. उदाहरण म्हणून प्रा.वा.ल.कुलकर्णी, प्रा.नरहर कुरुंदकर, प्रा.रा.भि.जोशी, प्रा.दि.के.बेडेकर, प्रा.रा.ग.जाधव, प्रा.म.भि.चिटणीस वसंत पळशीकर, रावसाहेब कसबे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, अशी नावे सांगता येतील.

'मराठी वाङ्मय आणि क्रांतिसन्मुखता' 'मी आणि माझे लेखन', 'धर्मदास्य', 'लोकशाहीविवेक आणि दलितमुक्ती' मराठी साहित्यातील सामाजिक लोकशाहीचा विचार असे परिसंवादाचे प्रातिनिधिक विषय सांगता येतील.

समाजसाहित्य, संस्कृती, धर्म (धर्मांतर) समीक्षा, तत्वज्ञान अशा विविध परंतु परस्परावलंबी विषयाचा अंतर्भाव परिसंवादात केलेला आहे. त्यामुळे यातून झालेल्या चर्चेला एक खोली व मूल्यगर्भता प्राप्त झालेली आहे. दलित साहित्याच्या संदर्भातील ही मूल्यगर्भता जास्त प्रमाणावर दिसून येते. या परिसंवादातून दलित साहित्याविषयी व्यक्त झ ालेल्या विचारांची काही सुत्रे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

प्रा.रा.ग.जाधव- 'मराठी क्षेत्रातील दलितांच्या विद्रोही साहित्याची बंडही मराठी समाजाच्या बहुजिनसी स्वरुपामुळे व्याप्ती दृष्ट्या सीमित राहील'. ('अस्मितादर्श' जाने.७७) पृ.१३

वसंत पळशीकर- 'त्यांनी (दलित साहित्यिकांनी) आपल्या वाङ्मयीन लढ्यासाठी आपले दलितपण राबवणे चुकीचे आहे'.

रावसाहेब कसबे - 'दलित साहित्य हा एक महत्वपूर्ण सांस्कृतिक संघर्ष वाटतो'. (जाने.७७) (पृ.१६).

प्रा.दि.के.बेडेकर- 'दलित साहित्यात मानवतावाद, विज्ञाननिष्ठा आणि विद्रोह या तीन प्रेरणा प्रभावी आहेत'. (जाने.७७) (पृ.१४).

दलित वाङ्मयाच्या उभारणीच्या वेळेते व्यक्त झालेले हे विचार आहेत म्हणून दलित साहित्याच्या जडणघडणीच्या संदर्भात यास विशेष मोल आहे हे दिसून येते.

**'अस्मितादर्श' मधील लेख :-**

'अस्मितादर्श'मधील लेखाचे स्वरुप साहित्य, समाज, शिक्षण संस्कृती, धर्म व संकीर्ण असे आहे. साधारणतः या लेखांचे स्वरुप विचारप्रधान आहे. दलित साहित्याचा विचार, दलित समाजाचा विचार, शोषितांचा विचार हा त्या लेखापाठीमागचा महत्वपूर्ण कणा आहे. नवसमाजनिर्मितीचा ध्यास या विचारांपुढे आहे तर धर्म, समाज, राजकारण, तत्वज्ञ ान, साहित्य आदींचा विचार या जाणिवेतूनच प्रस्तुत नियतकालिकांतून झालेला आहे दिसून येते.

साहित्यविषयक लेखामध्ये प्रामुख्याने प्रा.गंगाधर पानतावणे, डॉ.म.ना.वानखडे, राजा ढाले, केशव मेश्राम, ताराचंद्र खांडेकर, प्रा.रा.ग.जाधव, डॉ.जनार्दन वाघमारे, आदींचा सहभाग आहे.

समाज, राजकारण, धर्म, या विषयावर जे वैचारिक लेखन प्रसिध्द झालेले आहे. त्यात प्रा.दि.मा.खैरनार, ना.रा.शेंडे, प्रा.गंगाधर पानतावणे, प्रा.अशोक गोडघाटे, ताराचंद्र खांडेकर, मोतीराज राठोड, रावसाहेब कसबे, प्रा.भाऊ लोखंडे, रत्नाकर गणवीर, वसंत मून, डी.री.माने इ.चा निर्देश करता येईल.

विविध सामाजिक समस्यांची चिकित्सकपणे चर्चा करणारे निबंध, दलित, जीवन व सामाजिक अवहेलना यांची चर्चा, प्रस्तुत नियतकालिकातून या लेखांचा समाजजीवनाशी अधिक जवळचा संबंध आहे. त्यातुन एक दलित वैचारिकता सिध्द झाली आहे. हिंदू धर्मातील समाजधारणा, जातीयता, देवादिकाविषयींच्या रुढ-प्रचलित समजुती याविषयीचे विचार व सामाजिक हक्काबाबतची पोटतिडीक यातून दिसून येते.

उपरिनिर्दिष्ट सर्वच लेखकांची आपले विचार तर्कशुध्दपणे मांडलेले आहेत. विचारांच्या पुष्टीसाठी अनेकविध संदर्भ घेतले आहेत. म्हणून १९७० नंतरच्या वैचारिक वाङ्मयात, एकुण मराठी साहित्यात साहित्यात वैविध्यपूर्ण आणि मोलाची भर घालणारे हे लेख आहेत.

समाजजीवनात बीजे रुजविण्याचे कार्य नियतकालिके अधिक समर्थपणे करीत असतात काही नियतकालिके तर समाजात वैचारिक जागृती घडवून आणण्याच्या प्रमुख प्रेरणेतून उदयास येतात. अस्मितादर्शन हे नियतकालिक नववाङ्यमीन जाणिवा व प्रवृत्ती यांच्य तर उयाला आलेच आहे, पण त्याचबरोबर समाजात वैचारिक जागृती घडवून

ISSN 2321-4953
(Online)
December - 2017

आणण्याची प्रेरणाही त्याच्या पाठीमागे आहे. बहुजनांचे अंतःप्रवाह अस्मितादर्श मधून वाहत आहेत. आणि त्याचे वैचारिक अग्रदूत म्हणून हे नियतकालिक अनेक संकटांना सामोरे जात आजही ताग धरुन उभे आहे.

दलित चळवळ, दलित साहित्य आणि अस्मितादर्श यांचा परस्परपोषक संबंध आहे. दलित नियतकालिकाविषयी डॉ.हरिश्चंद्र निर्मळे म्हणतात, हिंदू धर्मातील चातुर्वण्य, जातिव्यवस्था, दुष्ट रुढी, आणि अनिष्ट चालीरिती यांनी शतकानुशतके दलितांना शैक्षणिक, आर्थिक आणि मानसिक गुलामगिरीत जखडून ठेवले होते. त्यांच्या व्यथा वेशीवर टांगण्याचे आणि त्यांचा त्यांच्या हक्कासाठी, उन्नतीसाठी जागृत करण्याचे कार्य या नियतकालिकांने हाती घेतले. आणि हेच वर्णन अस्मितादर्श ला तंतोतंत लागू पडते. कारण महाराष्ट्रातील दलित चळवळीचे, दलित साहित्याचे पडसाद यातून उमटले आहेत. दलित चळवळीला आकार देण्यासाठी या नियतकालिकाने यशस्वी वाटा उचलला आहे.

अस्मितादर्शमधील शोध आत्मचिंतनाचा, हरवलेपणा शोधण्याचा व स्वत्व शब्दांकित करण्याचा आहे. जे जाणवले अनुभवले ते टिपण्याचा आहे. उपेक्षा-उपहास, मानभंग-मनोभंग, शोषिकता-भावुकता, अपमान-सन्मान आणि तेजस्विता-उदासिनता हे सारे सारे बुरखा न पांघरता अभिव्यक्त करण्यासाठी अस्मितादर्श चा प्रवास झाला आहे.

**संदर्भ :**

१) नागनाथ कोतापल्ले-अस्मितादर्श-जून १९७०
२) मनोगत - अस्मितादर्श दिवाळी अंक -७६ पृ.१९३.
३) कांबळे अरुण - अस्मितादर्श, जानेवारी-७९
४) निर्मळे हरिश्चंद्र - दलितांची नियतकालिके.